नि.फौ.ख.क्र. २८०/२०१७

सरकार –वि– संतोष वाघमारे

नि.क्र.२१

**<u>नि.क्र.२० वरील आदेशाच्या अनुषंगाने साक्षीदार क्र.३ चा उलटतपास आरोपीचे विधीज्ञ श्री. ए. एस. वाकोडे यांच्या मार्फत शपथेवर सुरु.</u>**

माझे १० व्या वर्गापर्यंत शिक्षण झालेले आहे. मी तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशनला दिला होता. तोंडी रिपोर्टवर पोलीसांनी माझ्या दोन सह्या घेतल्या होत्या. मी कोणत्या तारखेला पोलीस स्टेशनला गेली होती हे आता मला आठवत नाही. मी रात्रीला पोलीस स्टेशनला गेली होती. मी रिपोर्ट दिल्यानंतर पोलीसांशी माझा संपर्क आला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, श्रीनाथ नावाच्या व्यक्तीशी माझा पहिला विवाह झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, श्रीनाथ याच्यासोबत माझ्या संमतीने फारकत झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, श्रीनाथ सोबत माझा संसार व्यवस्थित सुरु होता. हे म्हणणे खरे नाही की, श्रीनाथ याच्यासोबत माझी फारकत घेण्याची ईच्छा नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीसोबत माझी संबंध ठेवण्याची ईच्छा नव्हती.

लग्न झाल्यानंतर मी शेगाव येथील धनोकार नगरमध्ये किती वर्ष राहली हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, धनोकार नगर येथील घर मालकाशी माझी ओळख नव्हती व आजुबाजूच्या शेजाऱ्यांशी सुध्दा माझी ओळख नव्हती.

प्रश्न – तुमचे संतोषशी दुसरे लग्न झाल्यानंतर तुमचे आई वडील तुमच्या घरी जाणे येणे करत होते.

उत्तर – मिच माझ्या आई वडीलांना बोलावून घेत होती.

हे म्हणणे खरे आहे की, सणासुदीमध्ये मी संतोषसोबत आई वडीलांच्या घरी जात होती. मी दिलेला तोंडी रिपोर्ट पोलीसांनी मला वाचून दाखविला नव्हता व मी सुध्दा तो रिपोर्ट वाचून बघितला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे रिपोर्टमध्ये काय लिहिले आहे याबाबत मला माहिती नाही.

पोलीसांनी माझे बयाण नोंदविले होते. संतोषसोबत माझे लग्न कोणत्या वर्षी झाले ही बाब मी पोलीसांना बयाण देतांना सांगितली होती. संतोषसोबत माझे लग्न अकोला येथील नोंदणी कार्यालयात झाले ही बाब मी पोलीसांना बयाण देतांना सांगितली होती. लग्नानंतर मी डोंगरगाव येथे नांदण्यास गेली होती व डोंगरगाव येथे मी, माझे पती, सासु, सासरे, दिर व नणंद यांच्यासोबत नांदत होती ही बाब मी पोलीसांना बयाण देतांना सांगितली होती. लग्नानंतर आरोपीने मला सुरुवातीपासून त्रास दिला व आरोपीला बाहेरच्या बायांचा

नाद असल्यामुळे त्याने मला त्रास देण्यास सुरुवात केली होती ही बाब मी पोलीसांना बयाण देतांना सांगितली होती. तु मला पाहिजे नाही, तु तुझ्या आई वडीलांकडे परत जा, ही बाब मी पोलीसांना बयाण देतांना सांगितली होती. जसे मी माझ्या पहिल्या पत्नीला जाळून मारले तसे मी तुला जाळून मारुन टाकील अशी आरोपीने मला धमकी दिली होती, ही बाब मी पोलीसांना बयाण देतांना सांगितली होती. आरोपीने धमकी देवून सुध्दा मी घाबरली नाही कारण आरोपीसोबत मला संसार करायचा होता, ही बाब मी पोलीसांना बयाण देतांना सांगितली होती. आरोपी माझ्यासोबत याच कारणावरुन भांडण करत होते व आरोपीने माझ्यावर तेजाब मिश्रीत पेट्रोल टाकले होते, ही बाब मी पोलीसांना बयाण देतांना सांगितली होती. तु मला कितीही फसविण्याचा प्रयत्न केला तरी मी फसणार नाही, कोर्ट व पोलीस माझ्या खिशात असल्यामुळे तु माझे काहीही करु शकत नाही, ही बाब मी पोलीसांना बयाण देतांना सांगितली होती. माझ्या पतीने रॉकेल माझ्या अंगावर टाकल्यानंतर माझ्या आईकडे मला घेवून गेले व तेथून माझ्या आईने मला दवाखान्यात नेले, ही बाब मी पोलीसांना बयाण देतांना सांगितली होती. मला दवाखान्यात नेले तेव्हा मी होशमध्ये नव्हती व ज्यावेळेस आरोपीने माझ्यावर रॉकेल टाकले त्यावेळेस मी शेगाव येथील धनोकार नगरमध्ये राहत होती, ही बाब मी पोलीसांना बयाण देतांना सांगितली होती. मला त्रास देण्यासाठी आरोपीला त्याच्या घराच्यांकडून प्रोत्याहन मिळत होते, ही बाब मी पोलीसांना बयाण देतांना सांगितली होती. माझ्या मुलाने कितीही बाया वापरल्या तरी मला तुझी गरज नाही असे मला आरोपी क्र.१ ची आई यशोदाबाई म्हणत होती, ही बाब मी पोलीसांना बयाण देतांना सांगितली होती. आरोपीने माझ्यावर रॉकेल टाकण्यापूर्वी डोंगरगाव येथे माझे पूर्ण शरीर रस्सीने बांधले होते व त्याच अवस्थेत मला धनोकार नगर येथे आणले होते, ही बाब मी पोलीसांना बयाण देतांना सांगितली होती. माझे गावात बरेच अवैध धंदे आहेत असे आरोपीने मला सांगितले होते व मला आरोपीपासून विद्या नावाची मुलगी आहे, ही बाब मी पोलीसांना बयाण देतांना सांगितली होती. डोंगरगाव येथे माझे आरोपीशी भांडण होत असल्यामुळे मी शेगाव येथे राहायला आली होती, ही बाब मी पोलीसांना बयाण देतांना सांगितली होती. डोंगरगाव येथे भांडण झाले असता मी माहेर गेल्यावर आरोपी माझ्या माहेरी येवून मी तुला चांगले वागवितो असे म्हणून मला डोंगरगाव येथे घेवून गेला होता, ही बाब मी पोलीसांना बयाण देतांना सांगितली होती. त्यानंतर सुध्दा आरोपीच्या वागणुकीत कोणताही बदल झाला नाही, ही बाब मी पोलीसांना बयाण देतांना सांगितली होती. तु मेली तर ज्या स्त्रीसोबत माझे अनैतिक संबंध आहेत त्या स्त्रीला मी घरी आणणार असे आरोपी म्हणत होता, ही बाब मी पोलीसांना बयाण देतांना सांगितली होती. आरोपीने त्या त्रीला घरी आणले व त्या स्त्रीला आरोपीपासून एक मुलगा

आहे, ही बाब मी पोलीसांना बयाण देतांना सांगितली होती. वरील सर्व बाबी माझ्या तोंडी रिपोर्ट व बयाणामध्ये का नमुद नाहीत याचे कोणतेही कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी रिपोर्ट व बयाण माझ्या सांगण्यानुसार न नोंदविल्यामुळे वरील बाबी माझ्या रिपोर्ट व बयाणामध्ये नमुद नाही.

कथीत घटना घडल्यानंतर मी दोन महिन्यापेक्षा जास्त कालावधीकरीता बेहोश होती. हे म्हणणे खरे आहे की, दोन महिन्यापेक्षा जास्त कालावधीकरीता मी बेहोश असल्यामुळे दोन महिन्यामध्ये पोलीसांनी काय कारवाई केली याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, वस्तुचिन्ह–अ वर असलेली कॅन बाजारात सहजपणे उपलब्ध होते. हे म्हणणे खरे आहे की, मी संसार करण्याकरीता घरचे सर्व काम करते. हे म्हणणे खरे आहे की, दि.२६.०९.२०१७ रोजी घरच्या कामामुळे एलर्जीने माझ्या अंगावर लाल कलरच्या फुनशा व फोडे आले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचे बाहेरच्या स्त्रीशी अनैतिक संबंध असल्याची मी त्याच्यावर संशय घेत होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी आरोपीशी स्वतः वादविवाद करत होती. हे म्हणणे खरे नाही की, माझे श्रीनाथसोबत राहायची ईच्छा होती व आरोपीसोबत राहायची ईच्छा नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, तो वचपा काढण्याकरीता मी आरोपीविरुध्द खोटी रिपोर्ट दिली व आज खोटी साक्ष देत आहे. सन २०१६ मध्ये केरोसीनवर सरकारने बंदी घातली होती की काय याबाबत मला महिती नाही.

**<u>उलटतपास संपला.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| (एन. डी. मेश्राम) | (एन. डी. मेश्राम) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि.१५.०४.२०२६ | दि.१५.०४.२०२६ |